252 EXH-L (346)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/११४९ /२०१८
दिनांक : ३१ /०५/२०१८.

## "जाहिर नोटिस"

**( झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पुर्वसुचना )**

१ ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे.) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये महाराष्ट्र शासनाने, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१ दि.३०/०६/२००५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे;

२ आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

३ आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल झालेला आहे. प्रस्तावाच्या अनुषंगाने तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी सि.स.नं. ५६१/२, ५६१/अ-१ , ५६१/ब/१ आणि ५६२ , नाना पेठ पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची प्राथमिक पात्रता यादी दि.१६/०७/२०१५ रोजी निश्चित केलेली आहे. तसेच तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी दि.०३/०५/२०१६ रोजी झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी निश्चित केली आहे. कार्यालयीन परिपत्रक क्र.२०९, दि.०३/०६/२०१७ अन्वये सदरचे कार्यक्षेत्र उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क.१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे अखत्यारीत येत असलेने त्यांनी विषयांकीत मिळकतीच्या तीन पुरवणी पात्रता यादया प्रसिध्द केलेल्या आहेत.
दि. ०३/०५/२०१६ रोजी सादर केलेले मूळ परिशिष्ट-२ तसेच दि.०८/०९/२०१७ रोजी प्रसिध्द केलेली पुरवणी यादी क्र. १, दि. ०७/१०/२०१७ रोजी प्रसिध्द केलेली पुरवणी यादी क्र. २ व दि. २७/०२/२०१८ रोजी प्रसिध्द केलेली पुरवणी यादी क्र. ३ तसेच दि. ०५/०२/२०१८ चे शुध्दीपत्रक मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त जमिनीवर एकूण २७३ झोपडीधारक असून त्यापैकी पात्र निवासी २०४ पात्र बिगरनिवासी ४१ असे एकुण २४५ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी २४५ झोपडीधारकांनी (१००%) मे. आनंद डेव्हलपर्स यांना पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे;

४ आणि ज्याअर्थी, कार्यालयीन आदेश क्र. २१५ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे झोपडपट्टी सदृश परिस्थितीबाबत अंतिम निर्णय घेतल्यानंतर, सदरचे क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३(क) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणे आवश्यक राहिल, सदरचा आदेश झाल्यानंतरच योजनेच्या अनुषंगाने

प्राथमिक सर्वेक्षणाचे जाहिर प्रकटन, पात्रता यादी (परिशिष्ट-२) व इतर अनुषंगिक काम याबाबतची कार्यवाही करता येईल, अशी कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे;

५ आणि ज्याअर्थी, परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विषयांकीत मिळकतीची अंतिम पात्रता यादी सदर आदेशाच्या दिनांकापूर्वी प्रसिध्द झाली असल्याने परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबिता येणार नाही. ही बाब विचारात घेता पूर्वापार पध्दतीप्रमाणे विषयांकीत मिळकतीचा झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३(क) नुसार कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे;

६ आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे उपायुक्त तथा सक्षम प्राधिकारी, विभागीय कार्यालय क्र.३, पुणे महानगरपालिका यांनी विषयांकीत मिळकतीचा झोपडपट्टीसदृश परिस्थिती असलेचा अहवाल त्यांचेकडील कार्यालयीन पत्र जा.क्र. ३/३३ दि.११/०४/२०१४ रोजी सादर केला आहे व तसेच सदरच्या पत्रात जा.क्र. डीपीओ/२७६, दि. २५/०४/२०१३ रोजीचे विकास योजना विभागाचे झोनिंग डिमार्केशन अनुसार विषयांकीत मिळकत एमपीएस -२२ (प्रायमरी स्कुल) करीता आरक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच कार्यालयीन परिपत्रक क्र.२९५. दि.०१/०७/२०१७ मधील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१ यांनी विषयांकीत झोपडपट्टीची पाहणी करुन स्वतंत्र अहवाल सादर केला असून विषयांकीत मिळकतीच्या पाहणी अहवालामध्ये त्यांनी, "उपआयुक्त तथा सक्षम प्राधिकारी क्र.३, पुणे महानगरपालिका यांचे अहवालानुसार झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असल्याबाबत नमुद केले आहे;"

७ आणि ज्याअर्थी, विषयांकीत मिळकतीवर प्राथमिक शाळेचे आरक्षण असल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि. ११/०९/२०१४ रोजीच्या नियमावलीतील तरतुदीनुसार एसआर १९(१) अन्वये आरक्षित जागेवर ६०: ४० याप्रमाणात योजना राबविणे प्रस्तावित आहे;

८ आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिध्द झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी,कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो, व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबददल त्याची खात्री पटल्यावर, कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे,किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियमित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आंत अशी जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील", असे नमूद केले आहे ;

९ आणि ज्याअर्थी, या नोटीसव्दारे सोबत अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित आहे;

१० त्या अर्थी, या अनुसुचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्था यांना, त्यांच्या ज्या काही सूचना / हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत सादर करण्यास फर्मावण्यात येत आहे. अशा सुचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

253

344

अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा | विकसकाचे नाव व संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| सि.स.नं. ५६१/२, ५६१/अ-१, ५६१/ब/१ आणि ५६२, नाना पेठ, पुणे | ६७४०.४३ चौ. मी. | **पुर्वेस** - लागू रस्ता.<br>**पश्चिमेस** - लागू रस्ता.<br>**उत्तरेस** - न.भू.क्र. ६१५ व ६२० ते ६२७<br>**दक्षिणेस** - न.भू.क्र.५६३, ५६४, ५६५ व ५६६ | मे. आनंद डेव्हलपर्स, साधू वासवानी चौक, पुणे रेल्वे स्टेशन जवळ |

सदरची नोटिस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

(पांडूरंग पोले)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक - /०५/२०१८

C:\Documents and Settings\Administrator\Desktop\Shubhangi\prashant\...\sc aadesh as per २०१७ act.docx

प्रत - १) उपायुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका.
२) व्यवस्थापक, मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६.
३). मे. आनंद डेव्हलपर्स, कनवाल रिजन्सी, साधू वासवानी चौक, पुणे .०१.

Recd. Copy